# प्रेसनोट दि. ०६/०८/२०१९
# सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडुन जुगार अड्ड्यावर छापा

दि.६/८/२०१९ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे पुणे शाखेकडील पोलीस हवा.कुमावत यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून एम के रददी डेपो शेजारी ताडिवाला रोड पुणे येथे बेकायदेशीर जुगार अड्डा चालु असलेबाबत खबर मिळालेवरून तात्काळ बातमीची पडताळणी करुन पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली चांदगुडे सामाजिक सुरक्षा विभाग (गुन्हे) पुणे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. मिसाळ यांचे मार्गदर्शनाखाली एम के रददी डेपो शेजारी ताडिवाला रोड पुणे येथे चालु असलेल्या बेकायदेशीर मटका,गुडगुडी,अंदर बाहर,सोरट अड्ड्यावर छापा टाकुन एकुण ३९,६१०/- रु. किंमतीचा माल त्यामध्ये रोख रक्कम व जुगाराचे साहीत्य (मोबाईल सह) असा माल जप्त करुन जुगार घेणारे व खेळणारे असे एकुण ३५ इसमांविरूध्द बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला असुन सदर आरोपी यांना अटक करण्यात आली आहे.

वरील नमुद कारवाई श्री. बच्चनसिंग पो.उप.आयुक्त गुन्हे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्रीमती वैशाली चांदगुडे सामाजिक सुरक्षा विभाग, (गुन्हे)पुणे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री मिसाळ यांचेसह सामाजिक सुरक्षा विभागाकडील पो.हवा. कुमावत, पो हवा क्षिरसागर, पो ना चव्हाण, पो.ना. माने, पो.ना.कांबळे, पो.ना.पठाण, पो.शि.कोळगे, पो.शि खाडे व पो शि चव्हाण यांनी केलेली आहे.